**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दिनांक २५ जानेवारी २०१९**

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ५७/२०१९ भादविसंक ३८०,४५७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | १९/०१/२०१९ रोजी १०.०० वा चे सुमारास १९३ नई जिंदगी,भिमा शंकर नगर, सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | २४/०१/२०१९ रोजी ०८.४४ वा |
| फिर्यादी | : | रफिक म.शरीफ शेख वय-५६ वर्ष रा. १९३ नई जिंदगी,भिमा शंकर नगर, सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | अनोळखी |
| गेला माल | : | १) ३५०००/-रू किंमतीचे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मनी मंगळसुत्र व ५ ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याचे फुले एकुण १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जु.वा.किं.अं.<br>२) १५०००/-रू १०० रू दराचे १०० चलनी नोटा तसेच ५० रू दराचे १०० चलनी नोटा किं.अं.रू<br>**५००००/-रू** |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यात दि.१९/०१/२०१९ रोजी चे रात्री १०.०० वा ते दि.२३/०१/२०१९ रोजीचे रात्री १०.३० वा च्या दरम्यान माझ्या घरासमोरील लोखंडी गेटवरून आत प्रवेश करून माझ्या बेडरूमचे कडी कोंयडा व कुलूप कशाने तरी उचकटुन बेडरूमध्ये प्रवेश करून बेडरूम मधील असलेले गोदरेज कंपनीचे लोखंडी कपाट उघडुन तेथेच लॉंकर जवळ असलेली चावी घेवुन त्या चावीने लॉंकर उघडुन त्यातील सोन्याचे १५ ग्रॅम वजनाचे दागिने व रोख रक्कम १५०००/-रू असे सर्व मिळुन ५००००/-रू चे दागिने व पैसे चोरून नेले आहे म्हणुन तपासः-पोसई/मुरकुटे |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ६९/२०१९ भादविसंक १४३,१४७,१४९,३२३,३२४,४२७,५०४,५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | २३/०१/२०१९ रोजी १०.३० वा चे सुमारास भारत रत्न इंदिरा नगर , सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | २४/०१/२०१९ रोजी ०६.३० वा |

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | : | सचिन अशोक करजगी वय-२६ वर्ष धंदा-शिक्षण रा.४३९, भारत रत्न इंदिरा नगर , सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | १) आकाश देवकर वय-२४ वर्ष रा. भारत रत्न इंदिरा नगर ,सोलापूर<br>२) रमेश विटकर वय-२२ वर्ष रा. भारत रत्न इंदिरा नगर , सोलापूर<br>३) लोकेश बुर्ला विटकर वय-२५ वर्ष रा. भारत रत्न इंदिरा नगर , सोलापूर<br>४) संतोष विटकर वय-२३ वर्ष रा. भारत रत्न इंदिरा नगर , सोलापूर |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यात दि.२३/०१/२०१९ रोजी २२.३० वा चे सुमारास मी माझे राहते घरासमोर थांबलो असताना आमते गल्लीतील १) रमेश विटकर २) संतोष विटकर ३) लोकेश बुर्ला(विटकर) ४) आकाश देवकर व इतर १० ते १५ लोक हे येवुन मला म्हणुन लागले की,तुझ्या मित्राने पोलीसांत दिलेली तक्रार माघारी घे असे म्हणुन शिवीगाळ करून त्याचपैकी एकाने मारहाण करण्यास सुरूवात केली व माझे काही एक न ऐकता इतरांनीही मला व माझ्या मित्रास लाथाबुक्यांनी मारहाण करून माझी होंन्डा सीडी डिलक्स कंपनीची मोटारसायकल तिचा क्रं.एमएच-१३-एई-५१६० या मोटारसायकलीचे समोरील पेट्रोल टाकीचे नुकसान अंदाजे २०००/-रू नुकसान केले आहे व जाता जाता तुम्हा सर्वांना बघुन घेतो असे म्हणत वरील इसांमानी आमचे गल्लीत दगडफेक करून आम्हास भयभीत करून गल्ली मध्ये घबराट पसरवण्यास कारणीभुत ठरल्याचे माझी वरील सर्व इसमाविरूध्द तक्रार आहे. म्हणुन तपास:-पोसई/बायस |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ७०/२०१९ भादविसंक ३२३,३२४,५०४,५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | २४/०१/२०१९ रोजी ०३.३० वा चे सुमारास भारत नगर घ.नं.१३५,टिव्ही केंद्रासमोर सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | २४/०१/२०१९ रोजी ०८.१२ वा |
| फिर्यादी | : | लक्ष्मण प्रभाकर कांबळे वय-३५ वर्ष धंदा-मजुरी रा. भारत नगर घ.नं.१३५,टिव्ही केंद्रासमोर , सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | आंनद प्रभाकर कांबळे भारत नगर घ.नं.१३५,टिव्ही केंद्रासमोर , सोलापूर |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यात दि.२४/०१/२०१९ रोजी सायंकाळी ०३.३० वा चे सुमारास माझे राहते घरासमोर माझा लहान भाऊ आनंद प्रभाकर कांबळे रा.सदर याने तुझ्या मेव्हना सचिन पारधे |

| | | |
|---|---|---|
| | | याने माझ्या विरूध्द पोलीसांत तक्रार का केली असे म्हणुन मला शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करून लाकडाने माझ्या हातावर अंगावर मारून जवळच पडलेला दगड हातात घेवुन माझ्या डोकीत मारून जखम होवुन रक्त आले आहे व मला आणखीन मुक्कामार लागला असुन माझी पत्नी बबीता ही भांडण सोडविण्यासाठी आली असता तीला पण शिवीगाळ करून दगड मारल्याने तीचे डावे हाताचे मनगटाला दगड लागुन हातातील बांगड्या फुटुन मुक्कामार लागला आहे तुम्हा दोघांना व सचिन पारधे असे तिघांना खल्लास केले शिवाय राहत नाही असे म्हणुन दमदाटी केली आहे म्हणुन तपास:- पोहेकॉ / ९३०भालेराव |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ६०/२०१९ भादविसंक ३३२,३५३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | २४/०१/२०१९ रोजी ०५.३० वा चे सुमारास जुना पुना नाका येथील पुलाच्या खाली सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | २४/०१/२०१९ रोजी ०८.२९ वा |
| फिर्यादी | : | पोकाँ/१८०६ फिरोज बाबासाब तांबोळी वय-३० वर्ष ने.शहर वाहतुक शाखा,दक्षिण विभाग सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | व्यकंटेश सुरेश हुल्लुर वय-२२ वर्ष रा.एमएसईबी बोळ,अंबिकानगर बाळे सोलापूर |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यात दि.२४/०१/२०१९ रोजी सायंकाळी १७.३० वा चे सुमारास जुना पुना नाका येथील पुलाच्या खाली मी पोलीस निरीक्षक पाटील साहेब व वरील नमुद पोलीस स्टाफ असे सर्वजन मिळुन विशेष मोहीमे अंतर्गत अवैध वाहतुक बिगर परवानाधारक वाहन चालक यांचे तपासणी करीत असताना रिक्षा क्रं.एमएच-१३-बीव्ही-०७६० चा चालक नामे राकेश तानाजी रणदिवे यांचेकडे लायसन्स व रिक्षांचे कादगपत्रे नसल्याने त्यास कागदपत्रे दाखविण्यास सांगितले असता त्या ठिकाणी सदर रिक्षाचे मालक नामे व्यकंटेश सुरेश हुल्लुर हे सदर ठिकाणी येवुन रिक्षांचे कागदपत्रे दाखविले व परंतु त्यामध्ये गाडीचे इन्शुरन्स व वाहन चालकांचे लायसन्स नसल्याने दंड भरणेस सांगितले असता आम्ही दंड भरणार नाही व रिक्षांही वाहतुक शाखेस घेवुन जावु देणार नाही असे म्हणुन रिक्षांचे मालक व चालकाने आम्ही करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा करून आमच्याशी हुज्जत घालुन शिवीगाळ व दमदाटी करून मारहाण केली आहे म्हणुन तपास:-सपोनि/जमादार |